प्रेस नोट　　　　　　दिनांक १४/१०/२०२६

# "म्हसवड पोलीसांनी चार वर्षापासुन गांजा केस मध्ये फरारी आरोपीस वाई येथुन ताब्यात घेवुन आवळल्या मुसक्या"

म्हसवड पोलीस ठाणे हद्दीतील आरोपी चरण लालासो शिंदे, वय – ३० वर्षे, रा. पाणवण ता. माण जि. सातारा यांचे मालकीच्या ऊसाचे शेतात १५,०२,५००/- रुपये किमतीचा एकूण ६० किलो १०० ग्रॅम वजनाचा गांजा सदृश अमंली पदार्थाची तीन पोती विक्री करण्याचे उद्देशाने स्वतःचे कब्जात बाळगले स्थितीत मिळून आला म्हणुन म्हसवड पोलीस ठाणे भाग-६ गु.र.नं.२३/२०२३ गुंगीकारक औषधी द्रव्ये व मनोव्यापारावर परिणाम करणारे पदार्थ प्रतिबंधक अधिनियम १९८५ चे कलम ८ (क),२०(ब),(ii) (क) अन्वये गुन्हा दाखल असुन सदर गुन्ह्यांचे तपासात आरोपी चरण लालासो शिंदे, वय – ३० वर्षे, रा. पाणवण ता. माण जि. सातारा यांस अटक करुन त्यांचेकडे गुन्ह्यांचे अनुषंगाने तपास केला असता आरोपी नं. १ याने सदरचा मुद्देमाल आरोपी नं. २ अमोल करे, पुर्ण नाव माहीत नाही व आरोपी नं. ३ अझर इनामदार, पुर्ण नाव माहीत नाही यांनी आणुन दिला असल्याचे सांगितले होतो.

सदर गुन्ह्यांतील फरारी आरोपी अमोल करे, पुर्ण नाव माहीत नाही व आरोपी अझर इनामदार, पुर्ण नाव माहीत नाही यांचा शोध घेतला असता ते मिळुन येत नव्हते. त्यांचा सर्वेपत्तरी शोध घेवुन मिळुन येत नव्हते. आरोपीचा गोपनिय बातमीदार व तांत्रिक माहीतीच्या आधारे शोध घेवुन आरोपी अजर इनामदार यांस ताब्यात घेवुन अटक केली असुन त्यांचेकडे त्यांचे नाव गावाबाबत विचार पुस केली असता त्यांनी अझर जब्बार इनामदार,वय -३५ वर्षे,रा.२०८९ फुलेनगर ता. वाई जि. सातारा असे असल्याचे सांगितले व गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. सदर गुन्ह्यांचा पुढील तपास सपोनि/ संदीप पोमण हे करीत आहेत.

सदरची कामगिरी मा. श्री. निखिल पिंगळे, पोलीस अधीक्षक,सातारा, श्री. वैशाली कडुकर, अपर पोलीस अधीक्षक, सातारा, व श्री. रणजित सावंत, उपविभागीय पोलीस अधिकारी, दहिवडी विभाग, दहिवडी यांचे मार्गदर्शनाखाली म्हसवड पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी श्री. संदीप पोमण, सहा. पोलीस निरीक्षक, अमित शिंदे, पोलीस उपनिरीक्षक, व अमंलदार अमर नारनवर, अनिल वाघमोडे, नवनाथ शिरकुळे, धिरज कवडे यांनी केली असुन कारवाईमध्ये सहभागी अधिकारी व अमंलदार यांचे पोलीस अधीक्षक, सातारा तसेच अपर पोलीस अधीक्षक, सातारा यांनी अभिनंदन केले.

(प्रभारी अधिकारी, म्हसवड पोलीस ठाणे यांचे मान्यतेने)

प्रति,
सर्व संपादक....